

जावक क्रमांक :-९६४/२०१९
वारजे माळवाडी पो.ठाणे पुणे
दिनांक :-२३/ ०२/२०१९

प्रति,
मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर

प्रतिवेदक :- आर.सी.मोरे, पोलीस नाईक ९९८. वारजे माळवाडी पो. ठाणे पुणे

विषय :- मिसींग झालेल्या मुलीचा तपास होणेकामी स्थानिक व प्रादेशिक वर्तमान पत्रामध्ये माहीती प्रसिद्वी होणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सादर करतो की, वारजे माळवाडी पो. ठाणे पुणे मनुष्य मिसींग रजि. नं.१९/१९ मधील फिर्यादी महीला नामे संतोषी भेराराम प्रजापती वय-४० वर्ष धंदा-व्यावसाय रा.सुरभी हाईटस जवळ वारजे जकात नाका, वारजे माळवाडी,पुणे मो.नं.९३५९७३६७५८,९०२८७६११०१यांनी खबर दिल्यात म।।र की दि.१४/०२/२०१९ रोजी मी नेहमीप्रमाणे दुकानामध्ये दिवसभर काम करत होते.कारण माझे पती आमच्या मुळ गावी राजस्थानला काही कामानिमित्त गेले होते.सायंकाळी मी दुकानात असताना पुजा मला मदत करत होती. सायंकाळी ९.०० वा.च्या दरम्यान ती घरी गेली.त्यानंतर १०.००वा.मी देखील दुकान बंद करुन घरी गेले.त्यावेळी पुजा घरात दिसली नाही.म्हणुन मी ममता व निर्मला यांच्याकडे चौकशी केली असता, ममता व निर्मला यांनी तीने आम्हास काही सांगितले नाही असे सांगितले. म्हणुन आम्ही रात्रभर आजुबाजुला शोध घेतला परंतु ती मिळुन आली नाही.नातेवाईकाच्याकडे शोध घेतला असता ती मिळून आली नाही. म्हणून माझे पती गावावरुन आल्यावर आज रोजी तिची मिंसीग तक्रार देत आहे. तिचे वर्णन खालील प्रमाणे

नाव. पुजा भेराराम प्रजापती वय-२० वर्ष रा.सदर रंगाने- गोरी , अंगाने-सडपातळ, नाक- सरळ, उंची- ४ फुट ५ इंच, अंगात-काळया रंगाची जीन्स पॅन्ट व लाईट कलरचा टॉप, डोकीचे केस काळे, डोळे काळे, पायात लाल रंगाची चप्पल,जवळ मौल्यवाण चिज वस्तू नाही जवळ मोबाईल नं.९५७९१०६४३८,८३९०९४४७८७

येणे प्रमाणे वरील वर्णनाची माझी मुलगी पुजा भेराराम प्रजापती वय-२० वर्ष रा.सदर ही दि.१४/०२/२०१९ रोजी सायंकाळी ९.०० वा.च्या दरम्यान राहत्या घरातुन कोणास काही नं सांगता कोठेतरी निघुन गेली आहे.

तरी वर नमूद केले मुलीचा तपास होणेकामी स्थानिक व प्रादेशिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी मिळणेस विनंती आहे.

मार्फत